# JANVIKAS SAMAJIK SANSTHA

## COVID-19 EMERGENCY RELIEF SUPPORT WORK Report

**Project Title:**

Provided dry rations to poor, needy and migrant families, run community kitchen and provide seeds to needful farmers of Beed district of Maharashtra, INDIA in COVID-19 situation.

**Project Period:** 01 April 2020 to 31 March 2021

**Project area:**

40 villages of Beed, Kaij, Dharur, Majalgaon, Ambajogai and Wadvani block of Beed district of Maharashtra INDIA.

**Target Group:**

NT, DNT, SC, ST, Pardhi, Lamaan, Vadar, migrant, farmers, poor, needy, hungry families, CORONA affected families.

**Total Beneficiaries:** 25000

**About Beed district Background:**

The Beed district is known as a district providing sugar cane cutter labour and this is mainly due to the vagaries of the nature. The community depends on agriculture which is suffering due to scanty rains and the continuous drought for last five years. The district is economically backward and poverty is spread all over especially it is very much visible in the villages and semi urban areas. More than 2500 farmers have committed suicide due to unproductive land and indebtedness. This forces more than 60% of population to migrate for sugar cane cutting.

**Impact of COVID – 2019 in Beed district:**

More than 7 lakh sugar cane cutters who have returned to their native villages are without any economic support. The farm labour, destitute, widows, support less, NT, DNT, Pardhi, Lamaan poor Community are without and work resulting in no food and purchasing capacity. Members of these families and children are hungry.

Along with this insecurity of food and livelihood, the health issue is serious. The poor are not in a position to afford the medicines, masks, sanitizers and not aware of the seriousness if CORONA.

CORONA patient numbers are increased in our area. So many villages in red zone, buffer zone and totally lock down. Poor, needy family's condition of this area is very bad due to Lock down and CORONA virus.

## Nature of the support

1. Awareness about Covid 2019.
2. Relief work of providing lodging and boarding with tea, snacks, food, Grocery kit sufficient for a month, Mask and sanitizers and coordination with administration and Govt.
3. Seeds and other needed material to 500 poor farmers.

The secretary and staff of Janvikas [JVSS] had meetings with Tahsildar of Kaij for planning the support activities to help poor of various supports like awareness, distribution of grocery kits and health protection material keeping in mind the rule regulations and precautions and guidelines set by the administration.

## The discussion brought forth the following points

1. Use of digital and social medial for Covid 19 awareness among SHGs groups, farmers, youth and migrant laborer.
2. JVSS campus acquired for quarantine and isolation center of migrant laborer. Food, water and health protection material provide to migrant sugar cane workers, labourers, Divanga, landless, poor, marginal farmers, single, deserted women and children.

## Provision of food for 10000 internal state migrants

Janvikas training center of Kaij is located on Pune - Nanded highway on two acres of land. Every year more than 6 to 7 lacks laborer from Beed migrate. The Govt declared total lockdown on 22 nd March and by then the migrant sugar cane labourers started returning and passing from the adjacent highway. They were hungry, thirsty and without and money. Due to total lockdown they were unable to get food and water as well as transport. They on their way started taking halt at Janvikas training center.

Janvikas formed a team of 20 volunteers to prepare food, 10 for morning and other 10 for evening preparation. This community kitchen had 15 volunteers to distribute the food for 24 hours and 5 volunteers to distribute water and other food supply arrangement for them.

Those who were unable to travel further were provided lodging boarding facility in the training center. Majority of them were women and children and special care was taken of them.

In all 10000 internal state migrants were provided the facility of community kitchen and health related material like mask and sanitizers at Janvikas Training Center from 22nd March till 15th June 2020.

## Migrants and labourers from other states

Laborers from Uttar Pradesh, Madhy Pradesh, Rajasthan, Zarkhand and Chattisgad migrate to Beed to work on construction sites, brick production, Hotel service, Stone and for other sundry work. Mostly they are daily wage earners. The work sites were closed due to lock down and the contractor escaped from paying them their dues. They were unable to move as well as being unknown were not getting food and other necessary requirements.

Janvikas team visited them in their slums, Tandas, work sites understood their difficulties. 150 as such families were then provided grocery kits sufficient for a month and provided health related protection material.

Two-time lunch boxes were provided to 250 people in the slums where there was no provision of food. They get food and they survived.

From the other district as well as from other states migrant laborers travelling in front of the Janvikas training center to their respective districts and villages. Janvikas Samajik Sanstha arranged two times meals from the community kitchens of the people who had gone on foot with their children. We also arranged temporary accommodation for them. They were helped as needed in terms of health.

## Support to migrants to reach their home town

In all 500 migrants from other states were provided Govt passes and vehicles to go back to their home villages and towns. Janvikas coordinated with Govt and Administration to make their travel smooth and hassle free.

## Distribution of Grocery Kits

The Volunteers, SHGs women in association with the Grampanchayat had surveyed the families of daily wage earners and found that majority of them have no food. The community identified composed of single deserted women, children, landless, Divayang, migrants from NT and DNT, Vadar, Masanjogi, Bhill. It was found that they had no employment and non liquid cash to purchase the

necessities of life and survival. The child, woman and the whole family were hungry. There was no food in the house. The family was surveyed according to their needs and in collaboration with Women helps Group and Gram Panchayat.

Appeal letter was send to heads of CSR, Donors for supporting them for a month. The response helped us to reach 2000 such families. Grocery kit sufficient for a moth was provided them with this support and JVSS is thankful to all these supporters.

The grocery kits were prepared through purchases from local shops. It included floor, rice, oil, dal, sugar, tea powder, Poha, masala, soap, sanitizer, Mask for health and biscuits for children. The kit was prepared assuming 5 members per family.

## Distribution process

Identify the poorest household (families) from given villages. Buy the Grocery kit from shop and Provide these Grocery kit to these poorest household (families).

Purchasing Emergency relief support of Grocery (food) Kit from shop keeper which including Rice, Salt, Refined Oil, Sugar, Chili Powder, Turmeric powder, Dalia, flour, Biscuits for children's, Poha to these families. Dal (Pulse) was purchased from local farmers. Due to the lockdown, farmers were not able to sell their Dal (Pulses) in the market. We purchase dal from the farmer in such a COVID-19 situation so it helped those farmers a lot. We made a kit pocket at Janvikas training center.

Through the villages volunteer, local transportation and villages women SHG groups we distribute these Grocery (food) Kit to Migrant workers, slum area peoples, homeless, Landless, Handicapped, Small Farmers, Destitute and deserted women, Poor women SHG Groups, Dalit, NT, DNT, Poor families In some cases door to door help was given.

## Awareness about Covid

Those to whom volunteers approached for the distribution were also made aware of how to use mask and sanitizers as well as other guidelines of the Govt to protect oneself from the Covid-19.

## Distribution of Seeds to 500 farmers

The farmers were unable to sell their vegetables and had no money. They were unable to buy seeds as they had no resource and unable to go out.

Janvikas distributed Seeds to farmers of remote locations in Kaij. Janvikas with the help of Grampanchayat surveyed such areas, estimated the loss they had due to their inability to sell what they had in their farms and also the suitable crop they otherwise cultivate in these hilly areas. Based on

the need and demands of these farmers they were provided seeds of Bajra and Tur bag sufficient for an acre of land. In all 500 such needy farmers were supported.

This helped these 500 farmers to cultivate their land for this season and maintain their livelihood in such a COVID-19 situation.

## 7000 N-95 Mask and sanitizer Distribution

Janvikas Organization distribute 7000 N-95 Mask and sanitizer for these front line workers i.e. Doctors, Nurses, Hospital staff, Police Department, Govt. offices, Administration offices, Municipal council workers, Safai Workers, Gram Panchayat employees, teachers, COVID yodha, Asha workers, Bank employees etc. of Beed district of Maharashtra INDIA for their security.

| Sr. No | Type of Beneficiary | Number of beneficiary | Type of relief Support |
|---|---|---|---|
| 1 | Provision of food for 10000 migrants laborers | 10000 | Accommodation, meals and water were provided free of cost to them |
| 2 | Construction sites, brick production, Hotel services, Stone and for other sundry work. Mostly they are daily wage earners. | 150 Family (per family 5 member 150 X 5 = 750 beneficiary) | Provided grocery kits sufficient for a month and provided health related protection material to these families. |
| 3 | Slum area, no arrangement of food | 250 Family (per family 5 member 250 X 5 = 1250 beneficiary) | Provide two time lunch box for them |
| 4 | Distribution of Grocery Kits | 2000 family (per family 5 member 2000 X 5 = 10000 beneficiary) | Provided grocery kits sufficient for a month and provided health related protection material to them |
| 5 | Distribution of Seeds to 500 farmers | 500 family (per family 5 member 500 X 5 = 2500 beneficiary) | Provided seeds of Bajra and Tur (Mahabeej Company) sufficient for an acre of land. In all 500 such needy farmers. |
| 6 | Support to migrants laborers to reach their home town | 500 Labor | These people were sent to their hometowns in coordination with the government, administration and media by following all the rules and regulations of the government of COVID-19 and trying to get government pass and government transport system to go to their state and village. |

| | | | |
|---|---|---|---|
| 7 | 7000 N-95 Mask Distribution | 7000 Peoples | Doctors, Nurses, Hospital staff, Police Department, Govt. offices, Administration offices, Municipal council workers, Safai Workers, Gram Panchayat employees, teachers, COVID yodha, Asha workers, Bank employees etc. of Beed district of Maharashtra INDIA for their security. |

## Our Supporter for COVID-19 relief work

1. Action Aid 2. SMILE Foundation 3. Azim Premji Philanthropic Initiatives
**4.** Other Individuals 5. The Good Share and Arvind Advance Material



Janvikas Samajik Sanstha
Azim Premji Philanthropic Initiatives





Shot on OnePlus

















जनविकास सामाजिक संस्था
केज जि. बीड महाराष्ट्र






LIC HFL
actionaid
COVID-19
EMERGENCY
SUPPORT
MAHARASHTRA




थकलेल्या भुकेलेल्या लोकांचा आधार म्हणजे "जनविकास"
कामगारांना जेवण
न्यूज 1 महाराष्ट्र




REDMI NOTE 8
AI QUAD CAMERA


THE GOOD SHARE
Arvind
Advanced Materials
JANVIKAS SAMAJIK SANSTHA
Supported By : The Good Share & Arvind Advanced Materials
Distribution Of N-95 Mask


JANVIKAS SAMAJIK SANSTHA
2020.09.16 15:38

## MEDIA LINKS:

1. https://go.shr.lc/3aBYPzR
2. https://go.shr.lc/3e1Tljk
3. https://youtu.be/FaNemkw0I_w
4. https://youtu.be/CUsHNM-Xfpc
5. https://go.shr.lc/2WsiQUN
6. https://youtu.be/cIoYFcLqLMI
7. https://youtu.be/VmvX0pNBlfA
8. https://go.shr.lc/2TAGJYO
9. https://youtu.be/exEhF3NScv8
10. https://youtu.be/P-6R-Uc4Iw4
11. https://youtu.be/Gzi3YM7WsIY
12. https://youtu.be/Zz4oU3Y-J1k
13. https://youtu.be/MwqpLbL7HDE
14. http://newsonemaharashtra.in/news/4375
15. https://youtu.be/IK4N3iFiKJc
16. https://youtu.be/GbJjOVVyYJ4
17. https://go.shr.lc/37hDXgw
18. https://youtu.be/bd1qSokeQ_4
19. https://youtu.be/C32sco2BCR0
20. https://www.youtube.com/watch?v=UzIX-vgpMr4
21. https://youtu.be/D4kqcai8YtE
22. https://youtu.be/AytmAesB2xQ
23. http://news1maharashtra.blogspot.com/2021/04/300.html
24. https://www.drushtikonnews.com/2021/04/300.html#.YIPlyqLQRpM.whatsapp
25. https://ibmjanmatnews.com/जनविकासच्या-वतिने-बीड-जि/?preview=true
26. https://youtu.be/UNRWxL9L3uw
27. https://www.youtube.com/watch?v=H1618ED_WkE
28. https://news1maharashtra.blogspot.com/2021/05/blog-post_10.html
29.

**NEWS**

www.epunyanagari.com ◆ Toll Free 9773927928

# पुण्य नगरी

औरंगाबाद ◆ गुरुवार, १४ मे २०२० । वर्ष : १८ । अंक : २८१ । पाने १२ ★ किमत : ₹ ४.००

# एक हजार कुटुंबीयांना 'जनविकास'चा आधार

## स्थलांतरितांसह गरजूंना महिनाभर पुरेल एवढा किराणा : फूड पॅकेटचेही वाटप

**बीड/प्रतिनिधीः** कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी लागू केलेल्या टाळेबंदीमुळे स्थलांतरित मजूर, कामगार, भूमिहिन तसेच अल्पभूधारक अशा वंचित घटकांतील लोकांचे जगणे मुश्कील बनले. दोन वेळच्या जेवणाची भ्रांत असलेल्या अशा एक हजार कुटुंबांची चूल पेटविण्याचे काम केज येथील जनविकास सामाजिक संस्थेने केली आहे. गावच्या दिशेने निघालेल्या मजुरांना फूड पॅकेटचेही वाटप केले.

दुष्काळ, आपत्तीमध्ये मदतकार्यात अग्रेसर राहणाऱ्या जनविकास सामाजिक संस्थेने कोरोनासारख्या संकटात गोरगरीब, कष्टकरी, दिव्यांग तसेच भूमिहिनांना आधार दिला आहे.

'जनविकास'चे सचिव रमेश भिसे यांच्या पुढाकाराने संस्थेतर्फे मदतकार्य करण्यात आले आहे. केजच्या तहसीलदारांसोबत बैठक घेऊन त्यात मदतीचे नियोजन करण्यात आले. कामाच्या शोधात आलेल्या व लॉकडाऊनमुळे केज शहरातच अडकून पडलेल्या ५० कुटुंबीयांना किराणा साहित्य उपलब्ध करुन दिले.



### प्रशिक्षण केंद्र बनले आश्रयगृह

जनविकास संस्थेचे केजमध्ये प्रशिक्षण केंद्र आहे. गावी परतणाऱ्या मजुरांना या प्रशिक्षण केंद्रात आश्रय देण्यात आला. तेथे राहण्याची व जेवणाची सोय करण्या आली. शंभरपेक्षा अधिक मजुरांना या केंद्रामुळे आश्रय मिळाला. कोरोनापासून बचावासाठी घ्यावयाची काळजी व प्रशासन तसेच शासनाने घालून दिलेल्या नियमांचे पालन करण्याबाबतही त्यांना समजावण्याचे काम 'जनविकास'चे सचिव रमेश भिसे व त्यांच्या सहकाऱ्यांनी केले.

कोरोना आजाराबाबत त्यांची जनजागृती करण्यात आली. इथून सुरु झालेला मदतीचा महायज्ञ अजूनही सुरुच आहे. केजसह घोडेखूर, सुर्डी, सोनेसांगवी, मांगवडगाव, माळेगाव, सुकळी, लहुरी, मुळूक, लिंबागणेश अशा २५ गावांमधील परित्यक्ता, निराधार, विधवा, गरीब, गरजू, दिव्यांग, अल्पभूधारक, भूमिहिन अशा एक हजार कुटुंबांना एक महिना पुरेल एवढ्या किराणा साहित्याचे वाटप करण्यात आले. तांदूळ, तूर, हरभरा व मसुराच्या डाळी, गहू, तेल, साखर, मिरची पावडर, शेंगदाणे, पोहे, बिस्कीट, चहापावडर, साबण आदी वस्तूंचा या कीटमध्ये समावेश आहे.

### गावी निघालेल्या मजुरांना फूड पॅकेट

शासनाने परवानगी दिल्यानंतर विविध ठिकाणी अडकून पडलेल्या मजुरांचे लोंढे गावी परतू लागले. मात्र, लॉकडाऊनमुळे वाटेत त्यांना चहा, पाण्याचीही सोय नव्हती. जनविकास संस्थेने ही अडचण दूर केली. संस्थेच्या वतीने गावी जाणाऱ्या मजुरांना रेडिमेड फूड पॅकेटस्‌चे वाटप केले. त्यामुळे या मजुरांना व त्यांच्यासोबत असलेल्या चिल्यापिल्यांना मोठा दिलासा मिळाला.

दैनिक दिव्य मराठी

28-May-2020
बीड जिल्हा Page 2

**दिव्य मराठी विशेष** • सामाजिक जाणिवेतून केज, धारूर, वडवणी, अंबाजोगाईतील महिलांना किराणा साहित्यासह धान्याचे वितरण

# जनविकास सामाजिक संस्थेकडून २३० निराधार महिलांना 'आधार'

**प्रतिनिधी** | केज

कोरोना विषाणूचा संसर्ग टाळण्यासाठी मागील दोन महिन्यांपासून लॉकडाऊनच्या घरात बसून असलेल्या २३० निराधार महिलांना जनविकास सामजिक संस्थेने आधार दिला आहे. महिनाभर पुरेल इतके अन्नधान्य आणि जीवनावश्यक वस्तूच्या किटचे वाटप करीत संस्थेने सामाजिक बांधिलकी जपली आहे. याशिवाय आवश्यकतेनुसार यापुढेही मदत करण्याचा संकल्प करण्यात आला आहे.

संपूर्ण जगाला हैराण करून टाकणाऱ्या कोरोना विषाणूचा संसर्ग टाळण्यासाठी गेल्या दोन महिन्यांपासून संचारबंदी आणि लॉकडाऊन लागू असल्याने हातावर पोट असणाऱ्या मजूर निराधार महिलांचे जनजीवन विस्कळीत झाले होते. अशा कुटुंबावर उपासमारीची वेळ आल्याने जनविकास सामाजिक संस्थेचे सचिव रमेश भिसे यांनी पुढाकार घेऊन मदतीचा हात पुढे केला. ॲक्शन एड. एल. आय. सी. हाऊसिंग फायनान्सच्या मदतीतून बीड जिल्ह्यातील केज, धारूर, वडवणी, अंबाजोगाई, बीड या पाच तालुक्यातील झोपडीत भुकेने व्याकुळ झालेल्या परित्यक्ता, निराधार, गर्भाशय काढलेल्या ऊसतोड महिला कामगार अशा २३० महिलांना महिनाभर पुरेल इतके अन्नधान्य आणि जीवनावश्यक वस्तूच्या किट वाटप करण्यात आल्या आहेत. त्यात गव्हाचे पीठ, तांदुळ, साखर, तेल, पोहे, हळद, मिरची पावडर, साबण, मीठ यासह इतर जीवनावश्यक वस्तूचा समावेश या किटमध्ये असून या कुटुंबांना त्यांच्या गावात जाऊन सामाजिक अंतर ठेवून किट वाटप केल्या.

या कुटुंबांना संकटाच्या काळात या केलेल्या मदतीतून मोठा आधार मिळाला आहे. याशिवाय महिलांच्या इतर अडचणी जाणून घेण्यात आल्या. जनविकास सामाजिक संस्थेने वाटपासाठी पुढाकार घेऊन सामाजिक बांधिलकी जपली. या उपक्रमाबद्दल ॲक्शन एड. एल.आय. सी. हाऊसिंग फायनान्सच्या निरिजा भटनाघर राधाजी, जनविकासचे रमेश भिसे व टीमचे कौतुक व अभिनंदन होत आहे.



केज येथे जनविकास सामाजिक संस्थेच्या वतीने महिला किराणा किट देण्यात आल्या.

### निराधार, परित्यक्ता महिलांना आधार मिळणे गरजेचे होते

*' या लॉकडाऊनच्या काळात रोजगाराचे साधन हिरावले गेल्याने समाजातील निराधार, परित्यक्ता महिलांची उपासमार झाली आहे. अशा कुटुंबांना आधार देण्यासाठी महिनाभर पुरेल इतके जीवनावश्यक वस्तूच्या किट वाटप केल्या आहेत. या उपक्रमासाठी ॲक्शन एड एलआयसी हाऊसिंग फायनान्सचे सहकार्य लाभले. यापुढेही समाजातील अशा घटकांना मदत करण्यासाठी प्रयत्नशील आहोत. समाजातील दानशुरांच्या सहकार्यातून व पुढाकारातून ही मदत करणे शक्य होत आहे.'*

– **रमेश भिसे,** सचिव, जनविकास सामाजिक संस्था, केज.

दैनिक भास्कर समूहाचे वृत्तपत्र
दिव्य मराठी
औरंगाबाद • एकूण पाने : २०+४=२४ | किंमत ₹ ४.०० | वर्ष ९ | अंक ३५४ | महानगर
divyamarathi.com शनिवार २३ मे २०२०

# जनविकास संस्थेतर्फे २७०० मजुरांना जीवनावश्यक किटचे वाटप; पायी जाणाऱ्या ३ हजार जणांना अल्पाहार

**प्रतिनिधी** | केज

केज तालुक्यातील सुर्डी फाटा येथील जनविकास सेवाभावी संस्थेच्या पुढाकारातून दोन हजार सातशे जीवनावश्यक किटचे वाटप करण्यात आले. तर गावाकडे पायी चाललेल्या परप्रांतीय तीन हजाराहून अधिक मजुरांची चहा, नाश्त्याची सोय करून भूक भागविली आहे.

कोरोना विषाणूचा संसर्ग रोखण्यासाठी संचारबंदी आणि लॉकडाउन लागू झाल्याने काम बंद पडले. त्यामुळे अनेक परप्रांतीय व स्थानिक मजुरांचा आपल्या मुलाबाळांसह डोक्यावर समान घेऊन रणरणत्या उन्हात गावी पायी प्रवास सुरू होता. केज - कळंब राज्य रस्त्यावरील सुर्डी फाटा येथे असलेल्या जनविकास सामाजिक संस्थेने या बिहार, झारखंड, छत्तीसगढ, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश राज्याकडे निघालेल्या मजुरांच्या अन्न - पाणी, चहा व नाश्त्याची सोय करून भूक भागविली.



लॉकडाऊनच्या काळात ऊसतोड मजूर हे गावी परतले. त्यांच्या हाताला कामधंदा नसल्यामुळे त्यांच्या कुटुंबाना अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. त्यांच्या घरात चूल पेटली पाहिजे म्हणून जनविकास सामाजिक संस्थेने गहू, तांदूळ, गोडेतेल, साखर, चहापत्ती, साबण, खोबरे तेल, बिस्किट या जीवनावश्यक वस्तूच्या किट तयार करून दोन हजार सातशे ऊसतोड मजुरांना त्यांच्या गावात सामजिक अंतर ठेवून या किटचे वाटप केले. ही मदत मजुरांपर्यंत पोहच करण्यासाठी संस्थेचे सचिव रमेश भिसे, मंगल भिसे, अजय भिसे, विजय भिसे, कोमल भिसे, सविता चाळक, आशा कापसे, अंजना मस्के, ज्योती लोकरे, शरद पवार, अशोक बिक्कड, मच्छिंद्र लांडगे, बाबा पोटभरे यांनी परिश्रम घेतले. दरम्यान, संस्थेच्या या कार्यात अनेक दानशूर लोकांचा वाटा आहे. संस्थेने ही किट मजुरांपर्यंत पोहचवण्याचे काम केले आहे.

## शेतातील ५५ क्विंटल गहू, हरभरा वाटप केला

रमेश यांनी स्वतःच्या शेतात पिकवलेला २५ क्विंटल गहू व ३० क्विंटल हरभरा विक्रीसाठी बाजारात नेला होता. मात्र कोरोनामुळे लॉकडाऊन लागू झाल्याने या परिस्थितीचा विचार करून त्यांनी तो माल परत आणून गोरगरीब आणि गरजू लोकांना वाटून टाकला.

दि. 23 मे २०२०

(महाराष्ट्र) बीड । जालना । औरंगाबाद

Youtube:-dainik loknayak E-Mail :- dainik

Portal :- www.eloknayak.in W

■ वर्ष ५ वे
■ अंक -२०४
■ पाने ४
■ RNI : Regd.No.MAH-MAR/2014/58090

पुरोगामी महाराष्ट्राचं...दैनिक

बीडचा लोकनायक

# जनविकास सामाजिक संस्थेच्या कम्युनिटी किचनने भागविली तीन हजार पेक्षा अधिक मजुरांची भूक

## जीवनावश्यक वस्तुंच्या २७०० किटचे वाटप

केज (प्रतिनिधी): रमेश भिसे हे नाव केज तालुक्यात आणि जिल्ह्यात सर्वपरिचित आहे. त्यांच्या जनविकास सामाजिक संस्थेच्या वतीने विविध समाजहिताचे व समाजोपयोगी उपक्रम राबविले जातात.

कोरोना विषाणूचा संसर्ग रोखण्यासाठी देशात लॉक डाउन असल्यामुळे काम बंद आहे. त्यामुळे अनेक परप्रांतीय व स्थानिक मजुरही आपले सामान मुलेबाळे यांना घेऊन रणरणत्या उन्हात पायी प्रवास करीत असल्याने अशा मजुरांच्याया जेवणाची व्यवस्था जनविकास सामाजिक संस्थेच्या वतीने करण्यात येत आहे. आता पर्यंत बिहार, झारखंड, छत्तीसगढ, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश अशा राज्यात जाणाऱ्या मजुरांच्या काफ़िल्याला अन्न-पाणी, चहा व नाष्ट्याची सोय या ठिकाणी केली गेली आहे. तसेच परप्रांतीय मजुरां



सोबतच स्थानिक मजुरांनाही काम (पान २ वर)

### जनविकास सामाजिक संस्थेच्या

धंदे नसल्यामुळे त्यांच्या ही कुटुंबात अडचणी निर्माण होत आहे. त्यांच्याही घरची चूल पेटावी म्हणून आता पर्यंत रमेश भिसे यांनी त्यांच्या जनविकास सामाजिक संस्थेच्या वतीने सत्तावीसशे जीवनावश्यक वस्तूंचे किट वाटप करण्यात आले आहेत. या किटमध्ये विविध प्रकारच्या लागणाऱ्या सर्व वस्तू आहेत. यामध्ये गहू, तांदूळ, गोडतेल, साखर, चहापत्ती, साबण, खोबरे तेल, बिस्किट या सर्व वस्तूंचा समावेश आहे.या कार्यात रमेश भिसे यांच्या धर्मपत्नी सौ मंगलताई भिसे, चिरंजीव अजय व विजय तसेच स्नुषा सौ. कोमलताई आणि ... परिवारातील सौ.सविता चाळक, आशा कापसे, अंजना मस्के, ज्योती लोकरे, शरद पवार, अशोक बिक्कड, मच्छिंद्र लांडगे, बाबा पोटभरे हे परिश्रम घेत आहेत आणि ही गरजू लोकांना घरपोहोच देत आहेत.

# छत्तीसगढच्या १५० मजूरांना केजच्या जनविकासने दिला आधार

मदतीचा महायज्ञ 16

बीड,दि.२८(प्रतिनिधी): कोरोना विषाणू संसर्ग सुरु झाल्यानंतर लॉकडाऊनच्या काळात केज पंचायत समिती इमारत बांधकामासाठी छत्तीसगढ मधून आलेले जवळपास १५० मजूर संकटात सापडले. या कामाच्या कंत्राटदाराने त्यांना वाऱ्यावर सोडून दिले असताना जनविकास सामाजिक संस्था पुढे आली व त्यांनी या मजूरांना १ लाख २० हजार रुपयाचे किराणा सामान स्वखर्चाने उपलब्ध करुन दिले. त्याच प्रमाणे वाशिम,यवतमाळ जिल्ह्यातून आलेल्या ७१ उसतोड कामगारांना निवारा देण्याचे काम जनविकासने केले. रमेश भिसे यांच्या नेतृत्वाखाली २५ वर्षांपासून ही संघटना मोठ्या प्रमाणात सामाजिक काम करत आहे.

सामान्य लोकांची मते घेवून लोकप्रतिनिधी म्हणून निवडून आलेल्या व्यक्तींनी खऱ्या अर्थाने जे सामाजिक काम केले पाहिजे ते काम सध्या कोरोना आपत्तीमध्ये राजकारणाशी संबंध नसलेल्या संस्था करत आहेत. त्यामुळे खऱ्या अर्थाने ही निस्वार्थ सेवा म्हणता येईल. लॉकडाऊन नंतर केज शहरात पंचायत समिती इमारतीच्या बांधकामासाठी आलेले छत्तीसगढचे १५० मजूर मोठ्या संकटात सापडले. त्यांच्या पालनपोषणाची



जबाबदारी असलेल्या कंत्राटदाराने या मजूरांना वाऱ्यावर सोडून दिले असताना रमेश भिसे यांच्या जनविकास सामाजिक संस्थेने माणूसकीचा धर्म म्हणून या मजूरांना १ महिना पुरेल एव्हढा सर्व जीवनावश्यक किराणा भरुन दिला. त्यासाठी संस्थेने स्वत:चे १ लाख २० हजार रुपये खर्च केले.

केज पोलीसांनी पकडलेल्या विदर्भातील ७१ उसतोड कामगारांना आश्रय देण्याचे काम जनविकासने विनामुल्य पार पाडले. विशेष म्हणजे यामध्ये दोन महिला नुकत्याच प्रसुत झालेल्या होत्या. त्यांची व नवजात बाळांची योग्य ती काळजी संस्थेने घेतली. गेली १५-२० दिवसात जेवढे मजूर केज-कळंब या रस्त्यावरुन जात आहेत त्या सर्वांना चहापाणी व मोफत खिचडी दिली जात आहे. जनविकास सामाजिक संस्था संपुर्ण जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात सामाजिक कार्य करत असून जवळपास २१ हजार लोक या संस्थेशी जोडले गेले आहेत. सध्या मजूरांच्या हाताला काम नसल्यामुळे लोक सहभागातून विविध कामे संस्थेने हाती घेतले आहेत.

ग्रामीण महाराष्ट्राचा 'बुलंद आवाज'
# आदर्श गावकरी

# कम्युनिटी किचनने भागविली ३ हजार मजुरांची भूक

## ▶ जनविकासच्या वतीने जीवनावश्यक २७०० किटचे वाटप

केज /प्रतिनिधी

लॉकडाऊन असल्याने परराज्यातील असंख्य मजुरांवर उपासमारीची वेळ आली आहे. त्यामुळे जनविकास सामाजिक संस्थेच्या वतीने कम्युनिटी किचनच्या माध्यमातून ३ हजारापेक्षा जास्त मजुरांची भुक भागवली आहे. तसेच २७०० किटचे वाटपही केले आहे.



रमेश भिसे यांच्या जनविकास सामाजिक संस्थेच्या वतीने चार राज्यातील ३ हजारापेक्षा जास्त मजुरांच्या कमिन्युटी किचनच्या माध्यमातून जेवनाची सोय करण्यात आली आहे. तसेच २७०० किटचे वाटप करण्यात आले आहे.

कोरोना विषाणूचा संसर्ग रोखण्यासाठी देशात लॉक डाउन असल्यामुळे काम बंद आहे. त्यामुळे अनेक परप्रांतीय व स्थानिक मजुरही आपले सामान मुलेबाळे यांना घेऊन रणरणत्या उन्हात पायी प्रवास करीत असल्याने अशा मजुरांच्याया जेवणाची व्यवस्था जनविकास सामाजिक संस्थेच्या वतीने करण्यात आली आहे. आता पर्यंत बिहार, झारखंड, छत्तीसगढ, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश अशा राज्यात जाणार्या मजुरांच्या काफ़िल्याला अन्न-पाणी, चहा व नाश्त्याची सोय या ठिकाणी केली गेली आहे. तसेच परप्रांतीय मजुरां सोबतच स्थानिक मजुरांनाही काम धंदे नसल्यामुळे त्यांच्या ही कुटुंबात अडचणी निमाण होत आहे. त्यांच्याही घरची चूल पेटावी म्हणून आता पर्यंत रमेश भिसे यांनी त्यांच्या जनविकास सामाजिक संस्थेच्या वतीने सत्तावीसशे जीवनावश्यक वस्तूंचे किट वाटप करण्यात आले आहेत. या किटमध्ये विविध प्रकारच्या लागणार्या सर्व वस्तू आहेत. यामध्ये गहू, तांदूळ, गोडेतेल, साखर, चहापत्ती, साबण, खोबरे तेल, बिस्किट या सर्व वस्तूंचा समावेश आहे. या कार्यात रमेश भिसे यांच्या धर्मपत्नी सौ मंगलताई भिसे, चिरंजीव अजय व विजय तसेच स्नुषा सौ. कोमलताई आणि जनविकास परिवारातील सौ. सविता चाळक, आशा कापसे, अंजना मस्के, ज्योती लोकरे, शरद पवार, अशोक बिक्कड, मच्छिंद्र लांडगे, बाबा पोटभरे हे परिश्रम घेत आहेत आणि ही गरजू लोकांना घरपोहोच देत आहेत.

## – याला म्हणायचे दातृत्व

▶ स्वतःच्या शेतात पिकविलेल्या वस्तूचे केले वाटप रमेश भिसे यांच्या शेतात पिकवलेला सुमारे पंचवीस क्विंटल गहू व तीस क्विंटल हरभरा हे विक्रीसाठी मार्केटमध्ये हे नेले होते. परंतु अचानक लॉकडाऊनमुळे निर्माण झालेली परिस्थिती पाहून त्यांनी तो सर्व माल वापस आणला व गोरगरीब आणि गरजू लोकांना वाटून टाकला. या कार्यात रमेश भिसे यांच्या पत्नीं मंगलताई भिसे, त्यांचे चिरंजीवही सहभाग घेतात.

## –आम्ही निमित्तमात्र, यात अनेकांचा सहभाग

▶ आमच्या या कार्यात अनेक दानशूर लोकांचा वाटा आहे. आम्ही संस्थेच्या वतीने प्राणीकपणे गरजवंतासाठी काम करीत आहोत व त्यांच्या पर्यंत मदत पोहोच करित आहोत.

▶ **रमेश भिसे**, जनविकास सामाजिक संस्था, केज

दैनिक महाराष्ट्र
www.esuryoday.in
सूर्योदय
Email :daily.suryoday@gmail.com
मुख्य संपादक : गंगाधर काळकुटे | संपादक :अशोक काळकुटे

# जनविकासच्या वतीने जिल्ह्यात चारशे शेतकऱ्यांना बी-बियाणे वाटप




केज :- दुष्काळ अतिवृष्टी आणि कोरोना व्हायरसचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी लॉकडाऊन यामुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांच्या मदतीला जनविकास संस्था धावली आहे जनविकास संस्थेने बीड जिल्ह्यातील चारशे शेतकऱ्यांना बी-बियाणे वाटप केले आहेत.

रमेश भिसे यांची जनविकास सामाजिक संस्था ही नापिकी, दुष्काळ तसेच मानवनिर्मित असो की, नैसर्गिक संकट असो अशा वेळी शेतकरी, शेतमजूर यांच्या अडीअडचणीच्या काळात या भागातील संकट ग्रस्तांच्या मदतीला धावून येते. सततच्या दुष्काळामुळे नापिकीला कंटाळून जिल्ह्यात हजारो शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. गतवर्षी पाऊस बरा झाला होता. मात्र दुष्काळ आणि अतिवृष्टीमुळे आलेली पिके कापणी करता आली नाहीत. त्यामुळे शेतकरी प्रचंड अडचणीत सापडला आणि त्यातच कोरोना व्हायरस व लॉकडाऊनमुळे शेतकऱ्यांचा माल मार्केट बंद असल्यामुळे बाजारात विक्री करता आलेला नाही. अशा परिस्थितीत शेतकरी आता या वर्षी खरिपाची पेरणी कशी करायची? याच्या चिंतेत असताना जनविकास संस्थेने केज तालुक्यातील विडा परिसरातील गौरवाडी व घोडेखुर या गावातील अल्पभूधारक व गरजू अशा चारशे शेतकऱ्यांना प्रत्येकी एक एकर क्षेत्रा प्रमाणे बाजरी आणि तूर या बाणाचे बी-बियाणे वाटप करण्यात आले. या प्रसंगी जनविकासचे रमेश भिसे व दादाराव वाघमारे यांच्या हस्ते बी-बियाण्यांचे वाटप करण्यात आले. यावेळी ग्रामपंचायत सदस्य अशोक वाघमारे, बाबासाहेब मुळे, मंगल भिसे, सविता चाळक, ऊतम गायकवाड, बाबा पोटभरे, अशोक बिक्कड, मच्छीद्र लांडगे हे उपस्थित होते.

दैनिक दिव्य मराठी
12-Jun-2020
बीड जिल्हा Page 2

**दिव्य मराठी विशेष** • केज तालुक्यात जनविकास सामाजिक संस्थेच्या वतीने लॉकडाऊनमधील मदतीनंतर आता बियाणेही केले वाटप

# मोफत बाजरी, तुरीचे बियाणे वाटप करत ४०० शेतकऱ्यांना मदत

**प्रतिनिधी** | केज



जनविकास सामाजिक संस्थेच्या वतीने गौरवाडी येथे शेतकऱ्यांना बियाणे वाटप करण्यात आले.

जिल्ह्यात नापिकी आणि कर्जबाजारीपणाला कंटाळून अनेक शेतकऱ्यांनी आत्महत्या करीत जीवनयात्रा संपविली आहे. तर अतिवृष्टी आणि नापिकीमुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. त्यातच कोरोनाच्या महामारीच्या संकटामुळे बाजारपेठ बंद असल्याने जनविकास सामाजिक संस्थेने केज तालुक्यातील ४०० अल्पभूधारक शेतकऱ्यांना बाजरी, तुरीचे बियाणे मोफत वाटप करून आधार दिला आहे.

मागील पाच वर्षांपासून सततच्या दुष्काळामुळे शेतीतून काहीच उत्पन्न पदरात पडत नसल्याने शेतकरी वर्ग हताश झाला आहे. नापिकीमुळे पेरणीसाठी केलेला खर्च ही निघत नसल्याने मेटाकुटीला आलेल्या बीड जिल्ह्यातील हजारो शेतकऱ्यांनी मृत्युला कवटाळले आहे. त्यात गतवर्षी ही शेतकऱ्यांनी कोरड्या दुष्काळात पाणी देऊन पिके आणली. मात्र पिके काढणीच्या वेळी झालेल्या अतिवृष्टी शेतकऱ्याच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावून घेतला होता. त्यातून ही निघालेले अनेक शेतकऱ्यांचा सोयाबीन आणि कापूस कोरोना विषाणूचे संकट आल्याने विक्री वाचून घरात पडून राहिला. आता खरीप हंगाम तोंडावर येऊन ठेपला असताना शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. अशा परिस्थितीत पेरणीला पैसे नसल्याने अल्पभूधारक शेतकरी चिंताग्रस्त आहेत. त्यांना पेरणी करणे शक्य नसल्याने जनविकास संस्थेने पुढाकार घेऊन केज तालुक्यातील विडा परिसरातील गौरवाडी, घोडेखुर या दोन गावातील अल्पभूधारक आणि ऊसतोड मजूर ४०० शेतकऱ्यांना बाजरी, तुरीचे बियाणे मोफत वाटप करीत या शेतकऱ्यांना आधार दिला आहे. या डोंगर पट्यात बाजरी पिकाचे उत्पन्न चांगल्या प्रकारे निघत असल्याने जनविकास सामाजिक संस्थेचे सचिव रमेश भिसे यांनी बाजरी आणि तूर बियाणे उपलब्ध करून दिले. त्यामुळे या शेतकऱ्यांचा बियाणे खरेदीवर होणाऱ्या खर्चाची बचत झाली असून पेरणीला बियाणे मिळाल्याने त्यांचा प्रश्न सुटला आहे. या वेळी विडा ग्रामपंचायतीचे सदस्य अशोक वाघमारे, शिवाजी वाघमारे, बाबासाहेब मुळे, रमेश भिसे, मंगल भिसे, सविता चाळक, उत्तम गायकवाड, विरभद्र पोटभरे, अशोक बिक्कड, मच्छिंद्र लांडगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

### किराणा किटचे वाटप

जनविकास सामाजिक संस्थेने यापूर्वी लॉकडाऊन दरम्यान केज तालुक्यातील गरजू निराधारांना किराणा साहित्य देत मदतीचा आधार दिला. आता ही संस्था शेतकऱ्यांच्या मदतीलाही आल्याने ऐन संकटकाळात मोठा आधार मिळाला आहे.

दैनिक दिव्य मराठी

16-Sep-2020
बीड जिल्हा Page 4

# ‘जनविकास’तर्फे कोरोना योद्ध्यांना मास्कचे वाटप

**प्रतिनिधी** | केज

केज तालुक्यातील कोरोनाशी लढा देणारे डॉक्टर्स, पोलिस, पत्रकार आणि आरोग्य यंत्रणेशी निगडीत असलेल्या कर्मचाऱ्यांना जनविकास सामाजिक संस्था, गुड शेअर व अरविंद अँडव्हान्स मटेरिअल्सच्या वतीने एन-९५ मास्कचे वाटप केले.

संपूर्ण जगाला हैराण केलेल्या कोरोना विषाणूने अनेक जण बाधित होत आहेत. त्यामुळे अशा संसर्गजन्य आणि बाधित रुग्णांच्या संपर्कात येणाऱ्या अत्यावश्यक सेवेतील डॉक्टर्स, पत्रकार, पोलिस, आरोग्य सेवेतील कर्मचारी, स्वच्छता कर्मचारी, अंगणवाडी व आशा स्वयंसेविका यांना या आजारापासून बचाव करण्यासाठी आवश्यक असलेले एन - ९५ मास्कचे वाटप करण्यासाठी जनविकास सामाजिक संस्थेने पुढाकार घेतला आहे. युसुफ वडगाव येथील पोलीस स्टेशन, प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामपंचायत, बँकेत कार्यरत असलेल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना जनविकास सामाजिक संस्था, गुड शेअर व अरविंद अँडव्हान्स मटेरियल्स यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक आरोग्य संघटनेने शिफारस केलेले एन - ९५ मास्क वाटप करण्यात आले. यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक आंनद झोटे, जनविकास सामाजिक संस्थेचे सचिव रमेश भिसे, सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय आटोळे, वैद्यकीय अधिकारी डॉ. विद्रोही भालेराव, उपसरपंच शिवहार थळकरी, सचिन जावळे, ग्रामसेवक सुरवसे, पत्रकार गौतम बचुटे, सचिन उजगरे, विजय भिसे, बाबा पोटभरे, अंजना मस्के, ज्योती लोकरे, गोविंद चव्हाण यांची उपस्थिती होती.



जनविकास सामाजिक संस्था, गुड शेअर व अरविंद अँडव्हान्स मटेरिअल्सतर्फे एन-९५ मास्कचे वाटप केले.

**हा स्तुत्य उपक्रम :** *हा स्तुत्य उपक्रम जनविकास सामाजिक संस्थेने पोलिस कर्मचाऱ्यांना एन- ९५ दर्जेदार मास्क उपलब्ध करून दिले. त्यांचा हा स्तुत्य उपक्रम असून या मास्कमुळे कोरोना संसर्गापासून बचाव होण्यास मदत होईल.* -**आनंद झोटे,** *सहायक पोलिस निरीक्षक, युसूफवडगाव ठाणे.*

दिव्य मराठी

## बीड जिल्हा 10-05-2021

**दिव्य मराठी विशेष** • केज परिसरात पालावर वास्तव्य करणाऱ्या गरजूंच्या मदतीसाठी संस्थेने घेतली धाव

# जनविकासकडून भटक्या पालातील गरजूंना किराणा

**प्रतिनिधी** | केज

कोरोनाच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे लॉकडाऊन करण्यात आल्याने भटक्या आणि पाल ठोकून वास्तव्यास असलेल्या गोरगरीब गरजूंना किराणा, जीवनावश्यक वस्तूचे केज येथील जनविकास सामाजिक संस्थेच्या वतीने वाटप करण्यात आले. त्यामुळे गरजूंना संकट काळात मोठा दिलासा मिळाला आहे.

कोरोनाच्या उद्रेकामुळे लॉकडाऊन असल्याने बीड जिल्ह्यातील भटके, विमुक्त, पारधी, लमाण, वडार, कैकाडी, घिसाडी आणि ऊसतोड कामगार या भटकंती करून हातावर पोट असलेल्या कुटुंबांची वाताहत सुरू झाली आहे. उपलब्ध जागेवर पाल ठोकून उत्पन्नाचे आणि जगण्याचे साधन उपलब्ध नसल्याने या झोपडीत राहणाऱ्या कुटुंबांकडे खाण्यासाठी काही शिल्लक राहिलेले नाही. बाहेर ही निघता येत नाही. तर भिक ही कोणी देत नाही. अशा परिस्थितीत जगावे की मरावे अशी अवस्था झालीय असा टाहो फोडत आहेत. अशा या गरजू कुटुंबांच्या मदतीला केज येथील जनविकास सामाजिक संस्था धावून आली आहे. संस्थेचे कार्यकारी सचिव रमेश भिसे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी पालावर जाऊन अन्नधान्य, किराणा आणि जीवनावश्यक वस्तूचे वाटप करीत संस्थेने सामाजिक बांधिलकी जपली आहे. संस्थेने तात्पुरता का होईना ही मदत केल्याने या कुटुंबांना जगण्यासाठी मोठा आधार मिळाला आहे. दरम्यान, याप्रसंगी बोलताना भिसे यांनी समाजातील दानशुरांनी या संकटकाळात गरजूंच्या मदतीला धावले पाहिजे. हीच खरी मदतीची वेळ आहे, असे सांगितले.


केज येथील जनविकास सामाजिक संस्थेच्या वतीने पालावर राहणाऱ्या गरजूंना किराणा, जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले.

### हातावर पोट असणाऱ्या घटकांची मदत गरजेची

*लॉकडाऊनमुळे हातावर पोट असणाऱ्या लोकांचा जगण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. शासन म्हणून यंत्रणेने या घटकांचा विचार केला पाहिजेच. परंतु, सामाजिक जाणीव म्हणून आम्ही आमच्या संस्थेच्या वतीने छोटीसी मदत केली. यापुढेही समाजातील इतर दानशूर घटकांनी पुढे येत विवंचनेत दिवस काढणाऱ्या आपल्या बांधवांसाठी पुढे यावे. एकत्र येऊन आपण सारे या संकटाचा सामना चांगल्या पध्दतीने करू.'*
- **रमेश भिसे,** जनविकास संस्था.

**Thanking You.**

**Regard,**

**Mr. Ramesh Bhise**
**Director,**
Janvikas Samajik Sanstha,
Kaij,Tq. Kaij, Dist.Beed - 43 11 23
Maharashtra (INDIA)
Mob. No.: 09421338398 / 09604182098

**Site: [www.janvikasbeed.org](http://www.janvikasbeed.org)**